श्री.प्रकाश नारायण सोनवणे, महाराष्ट्र कृषि सेवा गट-अ, प्रकल्प उप संचालक, कृषि व्यापार विषयक पायाभुत विकास कार्यक्रम (प्रकल्प), कृषि व पणन मंडळ, पुणे यांच्या पदस्थापनेबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन आदेश क्रमांकः आकृवि १०१९/प्र.क्र.६६/१५ अे
मंत्रालय विस्तार इमारत,
मंत्रालय, मुंबई - ३२.
तारीख: ०३ जून, २०१९.

वाचा:-१) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग, क्र. आकृवि १०१८/प्र.क्र.१५३/१५-अे, दि. ०८.०६.२०१८

२) प्रकल्प संचालक, कृषि व्यापार विषयक पायाभुत सुविधा विकास गुंतवणुक कार्यक्रम, कृषि व पणन मंडळ, पुणे यांचे पत्र क्र.जा.क्र./वाहतुक अनुदान/१२७९/२०१९, दि.०१.०२.२०१९ रोजीचे पत्र.

३) भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.४३७/६/INST/ECI/FUNCT/MCC/२०१९, दि.२६ मे, २०१९

प्रस्तावना :-

कृषि व्यापरविषयक पायाभुत सुविधा विकास गुंतवणुक कार्यक्रम व जे.एफ.पी.आर. हे दोन्ही प्रकल्प अनुक्रमे जुन, २०१८ व डिसेंबर, २०१८ रोजी पुर्ण झालेले असून प्रकल्पाचा अंतिम अहवाल मार्च, २०१९ अखेर पूर्ण करण्यात आला. त्यामुळे सदर प्रकल्पांतर्गत कार्यरत असलेल्या श्री.प्रकाश नारायण सोनवणे, महाराष्ट्र कृषि सेवा गट-अ यांच्या सेवा कृषि विभागाकडे प्रत्यार्पित करुन त्यांना कृषि विभागामध्ये पदस्थापना देण्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यांची मंजूरी प्राप्त झाली होती.

तथापि, दरम्यानच्या काळात सार्वत्रिक लोकसभा निवडणूक-२०१९ साठी दि. १० मार्च, २०१९ पासून राज्यात आदर्श आचार संहिता लागू झाली असल्याने श्री.सोनवणे यांचे पदस्थापनेचे आदेश निर्गमित करण्यात आले नाहीत. त्यामुळे श्री.सोनवणे हे कृषि व्यापार विषयक पायाभुत सुविधा विकास गुंतवणुक कार्यक्रम, कृषि व पणन मंडळ, पुणे प्रकल्पामधून दि.०१.०४.२०१९ पासून कार्यमुक्त होऊनही पदस्थापनेच्या प्रतिक्षेत आहेत. आता, संदर्भ क्र. ३ येथील पत्रान्वये भारत निवडणूक आयोगाने दि.२६ मे, २०१९ रोजीच्या पत्रान्वये लोकसभा सार्वत्रिक निवडणुक २०१९ करिता लागू केलेली आदर्श आचारसंहिता समाप्त झाली असल्याने श्री.सोनवणे यांना खालीलप्रमाणे पदस्थापना देण्यात येत आहे :-

शासन आदेश :-

महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४(४) (दोन) व ४ (५) मधील तरतुदीनुसार श्री.प्रकाश नारायण सोनवणे, महाराष्ट्र कृषि सेवा गट-अ यांची पुढील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे बदलीने पदस्थापना करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिका-यांचे नांव व सध्याची पदस्थापना	बदलीने पदस्थापना
१.	श्री. प्रकाश नारायण सोनवणे, महाराष्ट्र कृषि सेवा गट-अ, प्रकल्प उप संचालक, कृषि व्यापार विषयक पायाभुत सुविधा विकास गुंतवणुक कार्यक्रम (प्रकल्प), कृषि व पणन मंडळ, पुणे	कृषि उपसंचालक, रापविका, मृद संधारण व पाक्षेव्य, कृषि आयुक्तालय, पुणे

२. उपरोक्त अधिका-यांनी नियुक्तीच्या ठिकाणी तात्काळ रुजु व्हावे व तसा अहवाल आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत शासनास सादर करावा.

३. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सदरचे आदेश तात्काळ अंमलात येतील हे कृपया पहावे.

४. श्री. प्रकाश नारायण सोनवणे, महाराष्ट्र कृषि सेवा गट-अ, यांचा दि.०१ एप्रिल, २०१९ ते दि. ०२ जून, २०१९ हा बंधनात्मक प्रतिक्षाधिन कालावधी, महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१ मधील नियम ९ (१४) (एफ) मधील तरतुदीनुसार कर्तव्य कालावधी म्हणून नियमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६०३१७२१०४८७०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sugriv Sambhaji Dhapate

Digitally signed by Sugriv Sambhaji Dhapate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d02297f9b5e889636956e39bfae4ea112e908c0e9a7e572d4190f9709a817f51, serialNumber=fc102de27dc1b41e747ac6cbb491c4209459c3cf340720ea98fd1d95b19c9f65, cn=Sugriv Sambhaji Dhapate
Date: 2019.06.03 17:28:36 +05'30'

(सु. सं. धपाटे)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. प्रधान सचिव (पणन), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
२. सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
४. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

५. मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परिक्षा) ½, महाराष्ट्र मुंबई / नागपूर.
७. संबंधित विभागीय कृषि सह संचालक/जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (व्दारा आयुक्त (कृषि) पुणे)
८. कृषि सह संचालक, (आस्थापना), कृषि आयुक्तालय, पुणे
९. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी (व्दारा आयुक्त (कृषि) पुणे)
१०. संबंधित अधिकारी (व्दारा आयुक्त (कृषि) पुणे)
११. निवड नस्ती /१५अे.